राज्यस्तरीय कर्णबधीर असोसिएशन या संघटनेच्या विविध मागण्याबाबत निर्णय घेण्याकरीता मंत्रिमंडळ उपसमिती नेमण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्रमांक: नस्ती २०१९/प्र.क्र. २७) /अ.क.२
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १० मार्च, २०१९

प्रस्तावना :

मा. मंत्रिमंडळाच्या दिनांक ८.३.२०१९ रोजी झालेल्या बैठकीत "राज्यस्तरीय कर्णबधीर असोसिएशन या संघटनेच्या विविध मागण्याबाबत" या विषयावर चर्चा झाली. राज्यस्तरीय कर्णबधीर असोसिएशन या संघटनेच्या विविध मागण्याबाबत निर्णय घेण्याकरीता मंत्रिमंडळ उपसमिती नेमण्याबाबत निर्णय झाला. सदर निर्णयांच्या अनुषंगाने मंत्रिमंडळ उपसमिती निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

मा. मंत्रिमंडळाच्या दिनांक ८.३.२०१९ रोजीच्या बैठकीमध्ये झालेल्या निर्णयाच्या अनुषंगाने राज्यस्तरीय कर्णबधीर असोसिएशन या संघटनेच्या पुढील मागण्याबाबत निर्णय घेण्याकरीता मंत्रिमंडळ उपसिमिती नेमण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

अ) लातूर विभागात जीवन विकास प्रतिष्ठान व्दारा संचलीत निवासी मुकबधीर विद्यालय, लातूर या शाळेस ४० अनिवासी विद्यार्थी संख्येवर ११ वी व १२ वी कनिष्ठ महाविद्यालय अनुदान तत्वावर मान्यता देणे. सदर शाळेस अधिव्याख्याता ६ पदे, दुभाषक १ पद, लिपीक १ पद, शिपाई १ पद अशी एकूण ९ पदे असून सदर पदांना एकूण वार्षिक खर्च रु. ४२.६० लक्ष इतका असेल. तसेच नाशिक विभागात मुकबधीरांसाठी उच्च माध्यमिक विद्यालय सुरु करण्यास मान्यता देणे.

ब) सामान्य शासकीय शाळांमध्ये व प्रत्येक जिल्हयातील २ औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये सांकेतीक भाषा तज्ञांची नियुक्ती करणे.

क) अतितिव्र/तिव्र म्हणजे ८० टक्के व त्यावरील अपंगत्व असलेल्या दिव्यांग व्यक्तींना शाासकीय नोकरीमध्ये नियुक्तीत प्राधान्य देणे.

ड) श्रवण दोष असलेल्या आणि जिल्हा शल्यचिकित्सक यांनी प्रमाणीत केलेल्या कर्णबधीर व मुकबधीर व्यक्तीस मोटर वाहन चालविण्याचा परवाना देणे

इ) शासकीय नोकरीमध्ये नियुक्त झालेल्या मुकबधीर प्रवर्गातील अधिकारी/कर्मचारी यांची बेरा तपासणी करणे.

२. मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष व सदस्यांची नावे यथा अवकाश कळविण्यात येतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashrtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१९०३१०१६४९३१०६२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Dnyandev Laxman Sul

Digitally signed by Dnyandev Laxman Sul
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a19e16d10b98348341561863c7561e9fc35bb428cdc3ea443c0263495f76285a, serialNumber=0a540933faf44a550ca357b423fa83e6fdce81a4746d167dae68daa29726d41d, cn=Dnyandev Laxman Sul
Date: 2019.03.10 17:02:34 +05'30'

(ज्ञा. ल. सुळ)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.मुख्यमंत्री,महाराष्ट्र राज्य,मंत्रालय,मुंबई
२. मा.मंत्री (सामाजिक न्याय) यांचे खाजगी सचिव
३. मा.राज्यमंत्री (सामाजिक न्याय) यांचे खाजगी सचिव
४. मा.मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य,मंत्रालय,मुंबई
५. प्रधान सचिव,सा.न्या.व वि.स.विभाग, मंत्रालय, मुंबई
६. आयुक्त, अपंग कल्याण, पुणे